केंद्र पुरस्कृत कृषी उन्नती योजना-परंपरागत कृषी विकास योजना सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाकरिता केंद्र शासनाकडून प्राप्त निधी (केंद्र हिस्सा) लेखाशिर्ष क्र. **(२४०१ A७६२)** व त्यास समरुप राज्य हिस्सा लेखाशिर्ष (२४०१ A७७१) वितरीत करणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**आदिवासी विकास विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः बीयुडी-२०१७ / प्र.क्र.११ / कार्यासन.६**
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२
दिनांक: - १५/०३/२०१८.

वाचा -

१) वि. वि, शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०१७ /प्र.क्र.७५ / अर्थ-३, दि. १८.०४.२०१७..
२) वि. वि, शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०१७ /प्र.क्र. ९४ / अर्थ-३, दि. ३०.०६.२०१७ व दि.०६.०२.२०१८.
३) केंद्र शासन, कृषि आणि शेतकरी कल्याण मंत्रालयाचे पत्र क्रमांक २-१/२०१७-Org.Fmg(iii), दिनांक १८/०९/२०१७.
५) कृषि व पदुम विभाग, नस्ती क्र. पुरक२५१७/प्र.क्र.२४२/का-१७ अे.

**शासन निर्णय-**

केंद्र पुरस्कृत कृषी उन्नती योजना-परंपरागत कृषी विकास योजना अनुसूचित जमाती प्रवर्गासाठी मागणी क्र. टी-५, २४०१ पीक संवर्धन, ७९६- जनजाती क्षेत्र उपयोजना, (०१) जनजाती क्षेत्र उपयोजनांतर्गत योजना राज्य योजनांतर्गत योजना, (०१) (३०) कृषी उन्नती योजना-परंपरागत कृषी विकास योजना (केंद्र पुरस्कृत योजना ६० टक्के केंद्र हिस्सा ) लेखाशिर्ष २४०१ A७६२, ३३- अर्थसहाय्य याखाली रु.६९.८१ लाख इतका निधी तर (०१) (३१) कृषी उन्नती योजना-परंपरागत कृषी विकास योजना (कें.पु.यो. ४० टक्के राज्य हिस्सा) लेखाशिर्ष २४०१ A७७१, ३३-अर्थसहाय्य याखाली रु.४६.५४ लाख इतका निधी पुरवणी मागणीद्वारे अर्थसंकल्पीत करण्यात आला आहे.

केंद्र शासनाने संदर्भ क्र. ३ येथील पत्राद्वारे सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात कृषी उन्नती योजना-परंपरागत कृषी विकास योजने अंतर्गत रु.६९.८१ लाख इतका निधी वितरीत केला आहे. त्यानुषंगाने कृषि व पदुम विभागाच्या संदर्भाधीन क्र. ५ येथील प्रस्तावास अनुसरुन मागणी क्र. टी-५, २४०१ पीक संवर्धन, ७९६- जनजाती क्षेत्र उपयोजना, (०१) जनजाती क्षेत्र उपयोजनांतर्गत योजना राज्य योजनांतर्गत योजना, (०१) (३०) कृषी उन्नती योजना-परंपरागत कृषी विकास योजना (केंद्र पुरस्कृत योजना ६० टक्के केंद्र हिस्सा ) लेखाशिर्ष २४०१ A७६२, ३३- अर्थसहाय्य याखाली रु.६९.८१ लाख ( अक्षरी रुपये एकोणसत्तर लक्ष ऐक्यांऐंशी हजार फक्त) इतका निधी तर त्यास समरुप (०१) (३१) कृषी उन्नती योजना-परंपरागत कृषी विकास योजना (कें.पु.यो. ४० टक्के राज्य हिस्सा) लेखाशिर्ष २४०१ A७७१, ३३-अर्थसहाय्य याखाली रु.४६.५४ लाख ( अक्षरी रुपये सेहेचाळीस लक्ष चोपन्न हजार फक्त ) इतका निधी प्रशासकीय विभाग / नियंत्रक अधिकारी म्हणून सचिव, कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांना अर्थसंकल्पीय वितरण प्रणालीवर (BEAMS ) वितरीत करण्यास मंजूरी प्रदान करण्यात येत आहे.

२. सदर निधी अर्थसंकल्पीय वितरण प्रणालीवर वितरीत करण्यात आला आहे. नियंत्रण अधिकारी / विभागप्रमुख यांनी खर्चासंबंधीच्या सध्याच्या शासकीय धोरणास अनुसरुन मंजूर आराखडयानुसार याच वर्षात सदर निधी खर्च होईल याची दक्षता घ्यावी. तसेच उपलब्ध करुन दिलेल्या तरतूदीतून झालेल्या खर्चाचा अहवाल, लेखाशिर्षनिहाय / उपलेखाशिर्षनिहाय तसेच साध्य झालेले भौतिक उद्दिष्टनिहाय माहिती, निधी उपयोगिता प्रमाणपत्र, संबंधित क्षेत्रिय अधिकारी यांनी आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक; संबंधित अपर

आयुक्त, आदिवासी विकास; आदिवासी विकास विभाग व कृषि व पदुम विभाग यांना प्रत्येक महिन्याच्या १० तारखेपर्यंत पाठवणेबाबत सूचना देण्यात यावी.

३. नियंत्रण अधिकारी व विभाग प्रमुख यांनी आदिवासी उपयोजना क्षेत्रात अतिरिक्त आदिवासी उपयोजना क्षेत्रात तसेच आदिवासी उपयोजने क्षेत्राबाहेरील योजनांवर केलेला खर्च स्वतंत्रपणे नोंदविला जाईल याची दक्षता घ्यावी. जेणेकरुन शासनाला आदिवासी क्षेत्रातील व उपयोजने क्षेत्राबाहेरील योजनांवर होणा-या खर्चावर लक्ष ठेवता येईल.

४. सदर शासन निर्णय वित्त विभागाने **वाचा** येथील क्रमांक १ व २ अन्वये विभागास प्रदान केलेल्या अधिकारान्वये तसेच वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र. व्यय-१, दि. ०४/०२/२०१८ अन्वये दिलेल्या सहमतीस अनुलक्षून निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक 201803151658375124 असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Ravindra Digambarrao Aute

Digitally signed by Ravindra Digambarrao Aute
DN: cn=Ravindra Digambarrao Aute, o=Tribal Development Department, ou=Government of Maharashtra, email=rajendra.aute@nic.in, c=IN
Date: 2018.03.16 18:47:28 +05'30'

**(रविंद्र औटे)**
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत,**

१. प्रधान सचिव (कृषि) कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई.
२. आयुक्त, कृषि, महाराष्ट्र राज्य.
३. आयुक्त, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, नाशिक.
४. अपर आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक / नागपूर / ठाणे / अमरावती.
५. वित्त विभाग (अर्थसंकल्प- १९), मंत्रालय, मुंबई.
६. कृषि व पदुम विभाग मंत्रालय, मुंबई.
७. ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, ५ वा मजला, विधानभवन, मुंबई.
८. महालेखापाल (लेखापरिक्षा)/(लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर.
९. कार्यासन क्र. २ व ९, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
१०. निवड नस्ती (का.६), आदिवासी विकास विभाग.